सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# अधिक मास, सुट्टीचा दिवस, पौर्णिमा असा त्रिवेणी योग साधत श्रीस्वामी समर्थांच्या दर्शनासाठी गर्दी

## दर्शन व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३१ मे-**

अधिक मास, रविवार सुट्टीचा दिवस आणि पौर्णिमा असा त्रिवेणी योग साधत श्रीस्वामी समर्थांच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे स्वामी भक्तांनी अलोट गर्दी केली होती. श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर येथे 'श्रीं'च्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. त्यामुळे दर्शन व्यवस्थेत सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे.

श्रीक्षेत्र अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज हे लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे. राज्यासह परराज्य आणि परदेशातूनही स्वामीभक्त मोठ्या संख्येने याठिकाणी येत असतात. सुट्टयांच्या कालावधीत मंदिर परिसरात प्रचंड गर्दी होत असल्याने भाविकांना दर्शनासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. काही ठिकाणी गर्दीचे प्रमाण इतके वाढत आहे की, चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याची चिंता भाविकांनी व्यक्त केली आहे.

सध्या अक्कलकोट नगरपरिषदेच्या माध्यमातून तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विविध विकासकामे सुरू आहेत. मात्र, श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर आणि समाधी मठ परिसरातील पारंपरिक व मर्यादित जागेमुळे दर्शन व्यवस्थापनात अडचणी निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. भविष्यात भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता मंदिर परिसरातील अंतर्गत सुविधा आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे मत अनेक भक्तांनी व्यक्त केले आहे.

श्रीक्षेत्र शिर्डी, तुळजापूर, पंढरपूर आणि शेगाव येथील मंदिरांप्रमाणे आधुनिक आणि नियोजनबध्द दर्शन व्यवस्था अक्कलकोटमध्येही विकसित करण्यात यावी. स्थानिक आणि बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र रांगा, सुयोग्य मार्गदर्शन केंद्रे, प्रतीक्षागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि अन्य मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.भक्तांशी सौजन्याने वागणारे प्रशिक्षित सेवेकरी आणि कर्मचारी नियुक्त करणे, त्यांच्या मदतीसाठी पोलीस प्रशासनाचा समन्वय वाढविणे आणि गर्दी व्यवस्थापनासाठी तज्ज्ञ संस्थांची मदत घेणेही आवश्यक असल्याची मागणी पुढे येत आहे. विशेषतः दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि महिला भाविकांसाठी स्वतंत्र व सुलभ दर्शन व्यवस्था उभारण्यावर भर देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. वाढत्या भाविकसंख्येच्या पार्श्वभूमीवर सुरक्षित, सुसूत्र आणि भक्ताभिमुख दर्शन व्यवस्था निर्माण करण्यासाठी मंदिर समितीने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी स्वामी भक्तांकडून करण्यात येत आहे. अक्कलकोट हे देशभरातील स्वामी भक्तांचे प्रमुख श्रद्धास्थान असल्याने भविष्यातील गरजा लक्षात घेऊन दीर्घकालीन नियोजन करणे काळाची गरज आहे, असेही यानिमित्ताने सांगण्यात येते.





### ▶▶ महत्वाचे...

### अपघातात दुचाकीस्वार महिला जखमी

**सोलापूर, दि. ३१ मे-**

जोडभावी पेठ परिसरात झालेल्या एका अपघातात दुचाकीस्वार महिला गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. प्रणाली नंदकिशोर बालस्वरुप (वय-३२, रा.शाहीर वस्ती, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी अर्जुन गणपत पवार यांच्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रणाली बालस्वरुप ह्या दि.२८ मे रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरुन घराकडे येत असताना एम.एच.१३ एफ.बी.७३४९ या क्रमांकाचा दुचाकीस्वार अर्जुन पवार यांनी भरधाव येत बालस्वरुप यांना धडक दिली. यात त्यांचा डावा पाय फ्रॅक्चर झाला. पोलिस हवालदार दुधाळे हे पुढील तपास करीत आहेत.

----------------------------

### पंख्याला गळफास घेऊन महिलेची आत्महत्या

**सोलापूर, दि.३१ मे-**

एका ५६ वर्षीय महिलेने घरातील किचन रुममधील पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रेल्वे लाईन भागातील आरंभ अपार्टमेंटमध्ये रविवार, दि.३१ मे २०२६ रोजी पहाटे ४.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

जयश्री औदुंबर ठोकळ असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. जयश्री ठोकळ यांनी किचन रुममध्ये गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले. त्यांनी ही माहिती सदर बझार पोलिसांना दिली. पोलिस हवालदार एस.एम.मोरे यांनी घटनास्थळी पोहचून नातेवाईकांच्या मदतीने जयश्री ठोकळ यांना खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## तीन मुलींसह विवाहितेस हाकलून दिले; पतीसह सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

लग्नात कबूल केलेले पाच लाख रुपये माहेरुन आण असे म्हणत एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करुन तीन मुलींसह तिला हाकलून दिल्याबद्दल पतीसह सहा जणांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पती बाळकृष्ण काळे, सासरे भारत काळे, सासू द्रोपदा काळे, दीर राम काळे, चुलत सासू भीमा, नणंद सरस्वती (सर्वजण रा. कपासवाडी, जुहु सर्कल, वर्सोवा रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

याबाबत रुक्मिणी बाळकृष्ण काळे (रा.सेटलमेंट फ्रि कॉलनी, वांगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.११ मे २०१० ते दि.५ मे २०२६ यादरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी शिवीगाळ व मारहाण करत उपाशीपोटी ठेवले. लग्नात कबूल केलेले ५ लाख रुपये माहेरुन घेऊन ये तेव्हाच तुला व तीन मुलींना घरात घेतो, असे म्हणत हाकलून दिले. पोलिस नाईक चौधरी हे पुढील तपास करीत आहेत.

## वातावरण बदलांमुळे सोलापुरात डोळ्यांची साथ!

### जळजळणारे डोळे डॉक्टरांना दाखवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर शहर आणि परिसरामध्ये डोळ्यांची साथ आली आहे. गेल्या काही दिवसांपासून नेत्र तज्ञांकडे रुग्णांची संख्या वाढल्याचे दिसून येत आहे. डोळे लाल होणे, खाज सुटणे, जळजळणे, डोळ्यातून पाणी किंवा चिकट स्राव येणे ही लक्षणे असल्यास तत्काळ डॉक्टरांना दाखवावे, असे आवाहन नेत्रतज्ञ डॉ. निखिल तोष्णीवाल यांनी केले आहे.

डोळ्यांची साथ हा मुख्यत्वे विषाणू किंवा जिवाणूमुळे होणारा संसर्ग आहे. यामध्ये डोळे लाल होणे, खाज सुटणे, जळजळणे, आणि डोळ्यातून पाणी किंवा चिकट स्राव येणे ही प्रमुख लक्षणे असतात. हा संसर्ग स्पर्शामुळे वेगाने पसरतो. डोळे लालसर किंवा गुलाबी होणे.

डोळ्यात खडे किंवा कचरा गेल्यासारखे वाटणे. पापण्या एकमेकांना चिकटणे (विशेषतः सकाळी उठल्यावर). उजेडात पाहताना त्रास होणे. असा प्रकार आढळून आल्यास डॉक्टरांना डोळे दाखवून घ्यावेत.



### संसर्ग झालेल्या व्यक्तीने चष्मा वापरावा

संसर्ग झालेल्या व्यक्तीने बाहेर जाताना काळा गॉगल (चष्मा) वापरावा, ज्यामुळे डोळ्यांना धूळ आणि प्रकाशाचा त्रास होत नाही. चष्मा वापरल्याने आपल्या कुटुंबियांसह इतरांना संसर्ग होणार नाही. संसर्ग असताना डोळ्यांना मेकअप करणे टाळणे तितकेच गरजेचे आहे.

### डोळे आल्यास घ्यावयाची काळजी

हात स्वच्छ ठेवा. साबणाने किंवा हँडवॉशने वारंवार हात धुवा. डोळे चोळू नका. डोळ्यांना खाज सुटल्यास हाताने चोळू नका, यामुळे संसर्ग वाढू शकतो. डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करून घ्या. यासाठी तुमचा रुमाल, टॉवेल, उशीचे कव्हर इतरांना वापरू देऊ नका.

## 'विहिंप' च्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मे-**

विश्व हिंदू परिषद सोलापूर जिल्हा सामाजिक समरसता आयामच्या वतीने,पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रविवार दि.३१ रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास चार हुतात्मा पुतळ्याजवळील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रांताध्यक्ष प्रा.गजानन धरणे व जिल्हाध्यक्ष विष्णू मोंढे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.



याप्रसंगी विश्व हिंदू परिषद सोलापूर विभागाचे सहमंत्री संजयकुमार जमादार,जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे,जिल्हा उपाध्यक्ष अॅड.केदार पाटील,जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप, सामाजिक समरसता आयाम चे जिल्हा संयोजक चंद्रकांत कुलकर्णी, नैतिक मूल्य शिक्षणचे जिल्हा संयोजक चन्नबसवेश्वर सोलापूरे व जिल्हा सहसंयोजक रमेश बेंबळकर उपस्थित होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या.त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले,एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले.

त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकामे केली असल्याची माहिती याप्रसंगी उपस्थित प्रतिनिधीशी बोलताना विश्व हिंदू परिषद सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे यांनी दिली.

## जेलरोड ठाण्याचे पो.नि. शिवाजी राऊत यांची बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

जेलरोड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शिवाजी राऊत यांची नाशिक येथील पोलिस अकादमी येथे बदली करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पोलिस मुख्यालयाकडून राज्यातील पोलिस निरीक्षकांच्या विनंती बदल्यांचे आदेश शनिवारी रात्री काढण्यात आले. यामध्ये 'जेलरोड'चे पो.नि.राऊत यांचाही समावेश आहे.



सोलापूर पीटीएसमधील पोलिस निरीक्षक पांडुरंग भोपळे यांची मुंबई येथे, सीआयडीचे अविनाश पवार यांची सोलापूर ग्रामीणमध्ये बदली करण्यात आली. बीड येथील पोलिस निरीक्षक देवीदास गात यांची केगाव येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात बदली करण्यात आली. तसेच बीड येथील बालक कोळी, चंद्रपूर येथील आसिफराजा शेख, पुणे येथील रविंद्र कदम यांची सोलापुरात बदली झाली आहे.

# प्रगतीला संवेदनशीलतेची, ज्ञानाला सामाजिक जबाबदारीची, नेतृत्वाला लोककल्याणाच्या भावनेची जोड आवश्यक : डॉ. कामत





### अहिल्यादेवींचे विचार, कार्य समाजाला प्रेरणादायी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

आजच्या विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन आणि कृत्रिम बुध्दिमत्तेच्या युगात मूल्याधिष्ठित विकास महत्वाचे आहे. प्रगतीला संवेदनशीलतेची, ज्ञानाला सामाजिक जबाबदारीची आणि नेतृत्वाला लोककल्याणाच्या भावनेची जोड आवश्यक आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य या मूल्यांचे उदाहरण म्हणावा लागेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजनीश कामत यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सांगता समारंभात बोलताना ते पुढे म्हणाले, तीनशे वर्षांनंतरही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आणि कार्य समाजाला प्रेरणा देत आहेत. त्यांचे जीवन हे सेवा, समर्पण, न्याय, विकास आणि मानवतेचा अखंड दीपस्तंभ आहे.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक संकटे आणि वैयक्तिक दुःखाचे प्रसंग आले. मात्र त्यांनी प्रतिकूल परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. धैर्य, चिकाटी आणि दूरदृष्टीच्या बळावर त्यांनी मालवा प्रदेशात आदर्श प्रशासन उभे केले.

प्रशासन लोकाभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी कसे असावे याचे सर्वोत्तम उदाहरण अहिल्यादेवींच्या कार्यातून दिसून येते, असेही त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ साहित्यिक रघुराज मेटकरी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू मंदिरांचा जिर्णोध्दार, विहिरी, घाट, बारवांची निर्मिती केली. हुंडा देण्याच्या प्रथेला त्यांचा कडाडून विरोध होता. त्यांचे हे विचार आजही समाजाला उपयुक्त ठरतात. शेती करणाऱ्यांसाठी 'सात-बारा' पध्दत त्यांनीच सुरु केले.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी तीनशे वर्षांपूर्वी वृक्षारोपण, जल व्यवस्थापनाचे उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांचाच वारसा जपत आपल्या विद्यापीठाच्या वतीने पाच लाख वृक्ष लागवडीचा मोहीम हाती घेण्यात आला आहे. अहिल्यादेवी होळकर यांनी आदर्श प्रशासन चालवून उत्कृष्ट राज्यकारभार केला. त्यांचाच आदर्श आपण घेणे आवश्यक आहे.

प्र-कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वृक्षारोपण आणि गजीनृत्य सादर करण्यात आले. निबंध, चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान, अखिल भारतीय बहुभाषिक साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. सहाय्यक कुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे यांच्या निवडक स्त्री आत्मकथने या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, पद्मजादेवी मोहिते-पाटील, प्रा.देवानंद चिलवंत, प्रा.सचिन गायकवाड आदी उपस्थित होते. डॉ.केदारनाथ काळवणे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. डॉ.प्रभाकर कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ.तेजस्विनी कांबळे व प्रा.श्रुती देवळे यांनी सूत्रसंचालन केले.

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे ज्येष्ठ क्रीडाशिक्षक
गंगाराम महादेव घोडके
यांच्या सेवानिवृत्ती समारंभास हार्दिक शुभेच्छा



प्रमुख उपस्थिती


मा. वैजिनाथ हत्तुरे
माजी प्राचार्य


मा. महेश इंगळे
अध्यक्ष, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, अक्कलकोट


मा. सिध्देश्वर पाटील
अध्यक्ष, सोलापूर म.न.पा. व जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन


मा. नगरसेवक सी.ए. विनोद भोसले
अध्यक्ष, सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल असोसिएशन


मा. डॉ. प्रदिप तळवेलकर (गुरुजी)
सचिव, महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन


मा. धरेप्पा हत्तुरे
मार्गदर्शक मजरेवाडी शिक्षण संकुल

स्थळ
किल्लेदार मंगल कार्यालय, आसरा चौक, होटगी रोड, सोलापूर

दिनांक व वेळ
सोमवार, १ जून रोजी सकाळी ११:०० वाजता

शुभेच्छुक :
सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण क्रिडा शिक्षक महासंघ
**प्रा. संतोष खेंडे** - जिल्हाध्यक्ष
**सुहास छंचुरे** - शहराध्यक्ष
**कार्याध्यक्ष** : राजाराम शितोळे, **उपाध्यक्ष** : वसीम शेख, अजित पाटील, **सहसचिव** : श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण. **संचालकः** नावेद मुन्शी, प्रबुध्द चिंचोळीकर, डॉ. शरणबसवेश्वर वांगी, बाबूलाल इंगळगी, संतोष पाटील.

## राजमाता अहिल्यादेवींना अभिवादन



### राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त जी.एम.संस्थेतर्फे अभिवादन

**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती निमित्त चार हुतात्मा चौक येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था सोलापुरच्या वतीने जीएम संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्धवंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे, मिलिंद प्रक्षाळे, नागेश बंगाळे, अनिल गायकवाड, राजाभाऊ हौशेट्टी, जी.एम संस्थेचे विश्वस्त पप्पू गायकवाड, आप्पासाहेब बागले, प्रवीण सोनवणे, आदित्य वाघमारे, सुधीर चौघुले, यशपाल वाघमारे, मॉन्टी बाबरे, अभिनंदन गायकवाड, नेहाल क्षिरसागर, सनी दणाणे, बापू चलवदे, सनी दणाणे उपस्थित होते.



### अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श विचारांचा वारसा जपावा : चाकोते

**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भवानी पेठ घोंगडे वस्ती परिसरातील बिरूलिंगेश्वर धनगर समाज संघटना यांच्या वतीने श्रींची महापूजा आयोजित करण्यात आली. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या हस्ते महापूजा झाली. चाकोते म्हणाल्या की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी न्याय, धर्म, लोककल्याण आणि समाजहित यांचा आदर्श घालून दिला. देशभरातील मंदिरांचे जतन, घाट, विहिरी, धर्मशाळा उभारून त्यांनी जनसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असून समाजाने त्यांच्या विचारांचा वारसा जपून समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. याप्रसंगी रंजिता चाकोते यांचा सत्कार निलम्मा मंदकल व नागम्मा गंदाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास समाजाचे ज्येष्ठ आधारस्तंभ तथा माजी सभागृह नेते सुरेश पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी शरणप्पा डोळे, नरसप्पा मंदकल, विनायक पाटील, गंगाराम डोळे, मुदक्का करली, सुरेश मंदकल, बिपीन पाटील, शिवा मंदकल, सिद्राम हळ्ळी, सिद्राम मंदकल, विजय कोळी, लिंगराज मासरेड्डी, अमर गंजेळी, प्रविण डोळे, नवीन गोटीमुकूल, रवि मंदकल, सिद्राम डोळे, अंबादास कडगुड्डा, नागेश गंदाळ, संतोष कोळी उपस्थित होते. कार्यक्रमात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, महाआरती व त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.



### महापालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर महापालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील चार हुतात्मा पुतळा चौक येथील त्यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास नगरसेवक चेतन नरोटे, मनीषा माने, निमिषा वाघमोडे, शेखर बंगाळे, चंद्रशेखर पाटील, सागर पिसे, बिरप्पा बंडगर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे उपस्थित होते.



### रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रक्तदान महत्वाचे : महापौर कोंड्याल

**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त चार हुतात्मा पुतळा चौक येथे पुण्यश्लोक साम्राज्य संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना महापौर कोंड्याल यांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रक्तदानाचे मोठे महत्त्व असल्याचे सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले हे सामाजिक उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेविका संगीता जाधव, नागेश खरात, चंद्रशेखर पाटील, शेखर बंगाळे, शाहू सलगर, राम वाकसे, आकाश जाधव तसेच पुण्यश्लोक साम्राज्य संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांनी या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदान केले.

# शहर उत्तरमधील रस्त्यांसाठी २२ कोटींचा निधी

## आ. विजयकुमार देशमुख यांच्या प्रयत्नांना यश



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील रस्ते वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि नागरिकांना उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार विजयकुमार देशमुख यांच्या निधीतून तब्बल २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे मतदारसंघातील दोन महत्त्वाच्या रस्त्यांचा कायापालट होणार आहे.

मतदारसंघातील नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुकर आणि गतीमान व्हावा यासाठी आमदार विजयकुमार देशमुख शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून शासकीय मंजुरीचे अधिकृत पत्रही प्राप्त झाले आहे.

### दोन प्रमुख रस्त्यांच्या दर्जेदार कामाची आमदार विजयकुमार देशमुखांची ग्वाही

मंजूर झालेल्या २२ कोटी रुपयांच्या निधीमधून खालील दोन मुख्य मार्गांचे काम हाती घेतले जाणार आहे: १. बाळे ते देगाव रोड २. खेड ते केगाव रोड दर्जेदार आणि जलद कामाची ग्वाही दिली आहे. या निधीच्या मंजुरीबाबत बोलताना आमदार विजयकुमार देशमुख यांनी सांगितले की, 'सोलापूर शहर उत्तर परिसराचा सर्वांगीण विकास करणे हेच आमचे ध्येय आहे. मंजूर झालेल्या या निधीतून रस्त्यांची कामे अत्यंत उच्च दर्जाची (क्वालिटी) आणि जलद गतीने पूर्ण केली जातील, जेणेकरून नागरिकांना लवकरच याचा फायदा होईल.

या मोठ्या निधीच्या मंजुरीमुळे बाळे, देगाव, खेड आणि केगाव परिसरातील नागरिकांमधून आणि वाहनधारकांमधून आनंद व्यक्त केला जात असून, आमदार विजयकुमार देशमुख यांचे आभार मानले जात आहेत.

### अहिल्यादेवी होळकर यांचा पंढरपुरात जन्मोत्सव सोहळा



**तभा वृत्तसेवा, पंढरपूर, दि.३१ मे -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ जन्मोत्सव सोहळा येथे रविवारी (दि. ३१) विविध राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक संघटना, विविध संस्थांचे पदाधिकारी, समाजसेवक, मान्यवर, समाज बांधवांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा झाला.

सुशासन व लोकप्रशासन, लोककल्याण, धर्म, त्याग, न्याय या शब्दांना आपल्या विचार आणि कृतीतून शंभर टक्के न्याय देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी नैतिकतेचा आदर्श जगासमोर निर्माण केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आला.

राज्याची धुरा समर्थपणे पेलवणाऱ्या राजयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यकर्तृत्वाला मानाचा मुजरा म्हणत मान्यवर महिलांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी धनगरसमाज बांधवांसह सर्व जाती-धर्मातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आणाप्पा सोनकांबळे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा, करकंब, दि.३१ मे-**

गोगाव (ता. अक्कलकोट) येथील आणाप्पा सिताराम सोनकांबळे बीए,बीएड (इंग्लिश) हे १ जून २०२६ रोजी श्री. बसवेश्वर प्रशाला काजीकणबस ता.अक्कलकोट या प्रशालेतून तब्बल २५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अध्यापनाच्या कार्यातून सेवामुक्त होणार आहेत. या प्रदीर्घ कालावधीमध्ये त्यांनी अध्यापना बरोबरच चित्रकलेची आवडही जोपासली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जवळपास ५०० विद्यार्थ्यांनी एलिमेंटरी, इंटरमिजिएट परीक्षेमध्ये यश प्राप्त केले. सेवा कालावधीमध्ये त्यांची अध्यापन करण्याची पद्धती, मनमिळावू स्वभाव या वैशिष्ट्यांमुळे त्यांना श्री.बसवेश्वर प्रशाला काजीकणबस (ता.अक्कलकोट) इंग्लिश टीचर्स ग्रुप अक्कलकोट, भीम जयंती उत्सव मंडळ अक्कलकोट,मायक्रोस्टार्स कम्प्युटर्स अक्कलकोट या विविध संस्थांकडून सन्मानपत्र देऊन आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना मा. खासदार सुशीलकुमार शिंदे व मा.आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांच्या हस्तेही गोगाव ग्रामस्थांकडून आदर्श शिक्षक पुरस्काराने

#### तब्बल तीस वर्षांनी भेटले वर्गमित्र

कल्पवृक्ष शिक्षण शास्त्र विद्यालय जयसिंगपूर जि.कोल्हापूर येथून १९९६ साली बीएडची पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांचे वर्गमित्र राजेंद्र करपे, धनंजय भाजीभाकरे करकंब (ता.पंढरपूर, संदीप गदादे माळीनगर ता.माळिशरस) मानसिंग रूपनवर केडगाव ता.दौंड, राजकुमार दंदे सोलापूर यांची आणाप्पा सोनकांबळे यांच्याशी तब्बल ३० वर्षांनी या सेवानिवृती समारंभाच्या निमित्ताने श्री. स्वामी समर्थांची पावन नगरी अक्कलकोट येथे भेट घडून आली. त्यावेळी या सर्वच वर्गमित्रांनी एकमेकांना आलिंगन देत भेट घेतली.

### माझ्या घागरीला लाथ का मारला म्हणून विचारल्याने मारहाण करून चावा घेतला; महिला जखमी

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ मे-**

सार्वजनिक नळावर पाणी भरताना माझ्या पाण्याच्या घागरीला लाथ का मारला असे विचारणा करणाऱ्या एका महिलेस दोघा जणांनी मिळून दगड व लाकडाने मारहाण करून हाताला चावा घेतल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील शावळतांडा येथे शनिवारी सायंकाळी सहा वाजता घडली .

सविता संजय चव्हाण (वय ३० वर्ष, राहणार शावळ तांडा असे त्या मारहाण झालेल्या महिलेचे नाव असून शनिवारी सायंकाळी राहत्या घराजवळील सार्वजनिक पाणी भरण्याच्या टाकीजवळ त्यांना राहुल बळीराम राठोड व रमेश चव्हाण यांनी मिळून मारहाण केली . यात सर्व अंगाला मुकामार व डोक्याला जखम झाल्याने त्यांना अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयातील नवरा संजय चव्हाण यांनी रात्री दहा वाजता दाखल केले.

### खडी क्रशर मशीनवरून खाली पडून वेल्डर जखमी

**सोलापूर, दि. ३१ मे-**

वेल्डिंगचे काम करताना खडी क्रशर मशीन वरून तोल जाऊन खाली पडल्याने एक तरुण जखमी झाल्याची घटना माळिशरस तालुक्यातील कोंडभावी गावात शनिवारी सायंकाळी सहा वाजता घडली. महादेव रामा सुतार (वय २७ वर्ष, रा. करुली, ता. पंढरपूर) असे त्या जखमी तरुणाचे नाव असून तो शनिवारी सायंकाळी कोंडभावी गावातील खडी क्रशर मशीनवर वेल्डिंगचे काम करीत असताना खाली पडला . यात मुकामार लागून जखमी झाल्याने त्याला अकलूजच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाऊ चेतन सुतार याने आज रविवारी सकाळी दाखल केले.

### अहिल्यादेवी होळकर यांना महापौर कोंड्याल यांनी केले अभिवादन



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील त्यांच्या पुतळ्यास सोलापूर महापालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा, न्यायप्रिय प्रशासनाचा तसेच समाजहितासाठी केलेल्या योगदानाचा गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला.

या अभिवादन कार्यक्रमास सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक चेतन नरोटे, विनोद भोसले, नगरसेविका संगीता जाधव, मनीषा माने, शशिकला कस्पटे, तसेच नागेश खरात, सागर पिसे, बिरप्पा बंडगर, लखन गावडे, सोपान खांडेकर, राम वाकसे, राज बंडगर उपस्थित होते.

## बेपत्ता मुलीस शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सात तासांत शोधले; नातेवाईकांकडे केले सुपूर्द



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ मे-**

नातेवाईकांकडे राहण्यासाठी आलेली आणि रस्ता चुकल्यामुळे बेपत्ता झालेली १० वर्षांची मुलीला शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या ७ तासांत शोधले. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तत्परता दाखवत तिला सुखरूपपणे तिच्या नातेवाईकांच्या स्वाधीन केले.

अर्पिता ही सोलापूर येथील तिचे नातेवाईक शुभम बिराजदार (रा. भवानी पेठ) यांच्याकडे राहण्यासाठी आली होती. २९ मे रोजी सकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास ती घरातून बाहेर पडली, मात्र त्यानंतर ती परतलीच नाही. ती बेपत्ता झाल्याने नातेवाईकांनी शोध घेतला, परंतु ती मिळून आली नाही. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला. पोलिसांनी घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली.

त्यामध्ये अर्पिता ही कुंभार वेस, मधला मारुती, टिळक चौक मार्गे अश्विनी हॉस्पिटलच्या दिशेने गेल्याचे दिसून आले. पोलीस तिचा कसोशीने शोध घेत असतानाच, पोलीस अंमलदार संजय साळुंखे यांना ती अश्विनी हॉस्पिटल ते रिमांड होमच्या दरम्यान असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलीस उप-निरीक्षक मुकेश गायकवाड व त्यांच्या पथकाने तात्काळ त्या ठिकाणी धाव घेऊन अर्पिताला ताब्यात घेत नातेवाईकांकडे सुखरूप सुपुर्द केले. आपल्या मुलीला सुखरूप पाहून नातेवाईकांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

सदरची कामगिरी फौजदार मुकेश गायकवाड, पोलीस अंमलदार नंदराम गायकवाड, अंकुश भोसले, वाजिद पटेल, योगेश बर्डे, महेश शिंदे, शैलेश बुगड, संजय साळुंखे, अजिंक्य माने, अभिजीत धायगुडे, काशिनाथ वाघे, भारत पाटील, सिद्धाराम देशमुख, धीरज सातपुते, सुभाष मुंढे आणि बाळासाहेब काळे, श्याम सुरवसे यांच्या पथकाने पार पाडली.

## अहिल्यादेवींची जयंती उत्साहात



### राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ येथील मूर्तीचे पूजन

**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील चार हुतात्मा पुतळा चौक येथील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ येथे त्यांच्या मूर्तीस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापौर कोंड्याल यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय व विकासाभिमुख प्रशासनाचा आदर्श समाजाने जपावा. समाजहितासाठी केलेले त्यांचे योगदान आणि भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे, विनोद भोसले, नगरसेवक चेतन नरोटे, नगरसेविका संगीता जाधव, सागर भैया पिसे, उत्सव अध्यक्षा मनीषा माने, शशिकला कस्पटे तसेच नागेश खरात, बिरप्पा बंडगर, लखन गावडे, सोपान खांडेकर, राम वाकसे, राज बंडगर, सिंचू उपस्थित होते.



### अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्यावतीने अभिवादन

**सोलापूर, दि. ३१ मे-**

लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रियता आणि समाजहिताची अखंड तळमळ यामुळे भारतीय इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त संभाजी आरमार संघटनेच्या वतीने त्यांच्या पार्क चौक येथिल मुर्ती श्रीकांत डांगे व सतिश भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना संभाजी आरमार संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे म्हणाले की, 'राजमाता अहिल्याबाई होळकर या केवळ एक आदर्श राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या समाजहिताची जाणीव असलेल्या लोकनेत्या होत्या. त्यांनी आपल्या राज्यकारभारात सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. देशभरातील मंदिरे, घाट, विहिरी आणि धर्मशाळांच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीने प्रेरणा घेऊन समाजसेवेसाठी पुढे यावे. यावेळी शशिकांत शिंदे, गजानन जमदाडे, सागर ढगे, अजिंक्य पाटील, राजू आखाडे, राज जगताप, रेवण कोळी, ज्ञानेश्वर डोंबाळे, महिला आघाडीचे शहरप्रमुख संध्या हेब्बाळकर, गीता पवार, शोभा घंटे, अर्जुन शिवसिंगवाले, सागर दासी उपस्थित होते.



### छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडतर्फे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. ३१ मे-**

मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूर यांच्यावतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे, राजन जाधव, माजी उपमहापौर पद्माकर काळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर संस्थानांचा कारभार हाती आल्यावर आपल्या संस्थानात जागोजागी धर्मशाळा, विहिरी उभारून वाटसरुची सोय केल्या. मानवाबरोबर पशुपक्षांसाठी देखील औषधोपचार केंद्र उभारल्या, वन औषध लागवडीस प्रोत्साहन दिले. निरपेक्ष न्याय निवाडयासाठी प्रसिध्द होत्या. एक प्रजाहितदक्ष राज्यकर्त्या म्हणून आजही अहिल्याराणींच नाव निघते, असे मत मराठा सेवा संघाचे राम गायकवाड यांनी व्यक्त केले. या अभिवादन कार्यक्रमास नगरसेविका अकिला भागानगरी, माजी नगरसेवक हारुण शेख, कादर भागनगरी, बशीर सय्यद, राजू हुंडेकरी, रियाज पैलवान, रिझवान दंडोती, कय्युम मोहळकर, रुस्तुम शेख, रिजवान शेख, काशीब बेलीफ, मोहसीन नदाफ, तन्वीर गुलजार, गफूर शेख, हारिस शेख, तन्वीर शब्बीर फुलमामडी, हुजेर बागवान, अली बागवान आदी उपस्थित होते.

### जांबमुनी मोची समाज मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर

**सोलापूर, दि. ३१ मे-**

जांबमुनी मोची समाजसेवा मंडळ (शहर व जिल्हा) सोलापूर यांच्या अध्यक्षपदी सैदप्पा जंगडेकर यांची निवड करण्यत आली. तसेच जनरल सेक्रेटरी जगन्नाथ सज्जन यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष हणमंतु सयबोळु, दिनेश म्हेत्रे, दत्तू आसादे, यल्लप्पा तुपदोळकर, राजू अलकोड, विजय म्हेत्रे. सेक्रेटरी तिमराव खानापुरे, राजेंद्र कोरे, सहसेक्रेटरी सुनील म्हेत्रे, खाजप्पा कट्टीमनी, सागर कामाठी. खजिनदार शंकर मॅगेरी, सहखजिनदार बाबू विटे, डॉ. योगेश पल्लेलू. कार्याध्यक्ष अंबादास करगुळे, ऑडीटर कृष्णा म्हेत्रे, प्रसिध्दीप्रमुख दत्तात्रय नामकर, राम आसादे, राजू पेद्दी, कुपेंद्र ढाले. यांची निवड करण्यात आली.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि.३१ मे -**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे परिवेक्षक रजनी राऊळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे परिवेक्षक निलोफर सय्यद, मनीष बांगर, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, भालचंद्र साखरे, नासिर खान, सचिन साखरे आदी उपस्थित होते.





## महत्त्वाचे...

### भाजयूमोच्या माढा शहराध्यक्षपदी अनिकेत चवरे, उपाध्यक्षपदी गोटे





**माढा, दि. ३१ मे-**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या माढा शहराध्यक्षपदी अनिकेत चवरे यांची तर उपाध्यक्षपदी शिवरंग गोटे यांची निवड करण्यात आली. भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते यांना निवडीचे पत्र देण्यात आले. अनिकेत चवरे हे यापूर्वी माढा शहर राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष होते. ते रणजितसिंह शिंदे यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांना निवडीचे पत्र कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते देताना भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत उपस्थित होते. निवडीबद्दल त्यांचे जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, सम ाज कल्याण विभागाचे माजी सभापती शिवाजीराजे कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे, माढा नगरपंचायतीच्या गटनेत्या संजीवनी भांगे, नगरसेवक राजू गोटे, नगरसेवक दिनेश गाडेकर, यांनी अभिनंदन केले.



### अहिल्यादेवी जयंतीनिमित्त पिलीव येथे बसस्थानकावरील पुतळ्याचे अनावरण

**पिलीव, दि.३१ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त बसस्थानकावर नवीन पुतळ्याचे माळशिरस पंचायत समीतीचे माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, मांडवे गटाचे जिल्ह्य परिषद सदस्य गौतम माने, युवा नेते जीवन जानकर, मारुती पाटील, माजी नगरसेवक अप्पासाहेब देशमुख, पंचायत समिती सदस्य बाबासाहेब माने, तुकाराम देशमुख, माळशिरस पंचायत समितीचे उपसभापती अमोल मदने पाटील, माजी जिल्ह्य परिषद सदस्य गणेश पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे, राष्ट्रीय समाज पक्षाचे विधी व न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. विजय लेंगरे, माजी जिल्ह्य परिषद सदस्य राजेंद्र काकडे, भाजपचे माळशिरस तालुका मंडलाध्यक्ष नितीन मोहिते, माजी सरपंच संग्राम पाटील, नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, नितीन कपने, राजा मदने, लहु पाटील, हनुमंत मदने, भजनदास चोरमले, चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ, झिंजेवस्तीचे माजी सरपंच विठ्ठल मदने, दादासाहेब वगरे, आनंद पाटील, मुख्याध्यापक संताप शेंडगे, मोहन मदने, शाम मदने, जयशिव गलांडे, कुसमोडचे माजी सरपंच तुषार लवटे, महावीर धायगुडे, अजय खुर्द, विजय मदने, कुंडलिक कपने, दादासाहेब शिंगाडे, अंकुश भैस, उमेश सरवदे, अविनाश जेऊरकर, कुमार भैस, संजय पाटील, गणेश देशमुख, विजय मदने, आशिष सुळे, विश्वजीत गोरड, खंडु माने, देवा घेरडे यांच्यासह पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, सुळेवाडी, बचेरी, काळमवाडी, चांदापुरी परिसरातील समाजबांधव कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गझीढोल कार्यक्रम ाचे आयोजन केले होते.



### सांगोल्यात श्री अंबिका देवी मंदिरात हापूस आंब्यांची आकर्षक आरास

**सांगोला, दि.३१ मे -**

सांगोला येथील ग्रामदैवत श्री अंबिका देवी मंदिरात अधिक मास पौर्णिमेचे औचित्य साधून देवीला आंब्यांची आकर्षक आरास बांधली होती. दरवर्षी विविध सण आणि उत्सवांना श्री अंबिका देवीला वेगवेगळ्या प्रकारची आरास केली जाते. यावर्षी अधिक मासाचे विशेष महत्त्व साधून ही आम्र आरास पुजारी सोमनाथ गुरव व मयुरेश गुरव यांनी केली. अधिक मास पौर्णिमेनिमित्त देवीच्या मूर्तीला आकर्षक वस्त्र आणि सुवर्णालंकारांनी सजवले होते. संपूर्ण गाभारा आणि देवीच्या मुर्तीभोवती हापूस आंब्यांची सुंदर रचना केली होती. आंब्यांच्या या मनमोहक मांडणीमुळे संपूर्ण मंदिर परिसर सुवासाने दरवळून गेला होता. ही आरास दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना प्रसन्न करून गेली. अधिक मास पौर्णिमेच्या निमित्त ग्रामदैवतेच्या दर्शनासाठी आणि हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती.

# जिल्ह्यातील ८,७०० शिक्षकांच्या बदल्यांना स्थगिती

**६,२०० शिक्षक जनगणनेच्या कामात; प्रशिक्षणालाही ब्रेक, बदलीच्या प्रतिक्षेत शिक्षकवर्ग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मे -**

राज्यात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेचा थेट परिणाम आता शिक्षकांच्या बदली प्रक्रियेवर झाला आहे. जिल्ह्यातील तब्बल ८,७०० प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या तात्पुरत्या स्थगित केल्या आहेत. जनगणनेच्या महत्त्वपूर्ण कामासाठी ६,२०० शिक्षकांची प्रगणक आणि पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती केल्याने शासनाने बदली प्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या २,७७५ प्राथमिक शाळांमध्ये सध्या ८,७०० शिक्षक कार्यरत आहेत. यातील मोठा शिक्षक वर्ग जनगणनेच्या कामात गुंतल्यामुळे शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजावर परिणाम होऊ नये, यासाठी ग्रामविकास विभागाने सार्वत्रिक बदल्या स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामविकास विभागाच्या उपसचिव वैशाली डिगे यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात जनगणना कामाशी संबंधित 'गट-क' आणि 'गट-ड' कर्मचाऱ्यांसह प्राथमिक शिक्षकांच्या सन २०२६ मधील बदल्या सध्या राबवू नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे बदल्यांची वाट पाहणाऱ्या हजारो शिक्षकांच्या अपेक्षांना तात्पुरता विराम मिळाला आहे.

शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांची अंतिम मुदतही ३० मे ऐवजी ३० जूनपर्यंत वाढविली आहे. मात्र जनगणना प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शिक्षकांच्या बदल्यांबाबत कोणताही निर्णय होण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत मिळत आहेत. जनगणना पूर्ण झाल्यानंतरच पुढील निर्णयाची शक्यता आहे. त्यामुळे जनगणना, मतदारयादी पडताळणी आणि शैक्षणिक जबाबदाऱ्या यांचा ताळमेळ साधण्यासाठी शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे प्रशासनाला दिलासा मिळाला असला, तरी बदलीच्या प्रतिक्षेत असलेल्या हजारो शिक्षकांच्या प्रतिक्षेत मात्र आणखी वाढ झाली आहे.

### अभ्यासक्रम प्रशिक्षणालाही ब्रेक

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या नव्या अभ्यासक्रमासाठी मे महिन्यात नियोजित शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमही पुढे ढकलला आहे. जनगणनेच्या जबाबदाऱ्यांमुळे शिक्षकांना प्रशिक्षणासाठी वेळ उपलब्ध नसल्याने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

### दुर्गम भागातील शिक्षकांची प्रतिक्षा वाढली

यंदा सुधारित बदली धोरणामुळे दुर्गम आणि अवघड क्षेत्रात सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांना सुगम भागात बदली मिळण्याची मोठी अपेक्षा होती. अनेक शिक्षकांनी बदलीसाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया पूर्ण केली होती. मात्र जनगणनेमुळे ही संपूर्ण प्रक्रिया थांबल्याने त्यांना आणखी काही काळ प्रतिक्षा करावी लागणार आहे.



## जावईबापू येता घरा...तोचि दिवाळी दसरा

**अकलुजमध्ये जावयाला धोंडा देण्यासाठी बाजारपेठेत गर्दी**

**अकलूज, दि. ३१ मे -**

अधिक महिन्यात जावयास घरी बोलवून त्याचा सन्मान केला जातो. ही पारंपारिक पद्धत चालत आलेली असून अकलूज मध्ये सध्या कपडे बाजार, भांडी, सोन्याचे दुकाने शनिवार रविवार सुट्टीचा दिवस गाठून गच्च भरलेले दिसत आहेत.

आपल्या संस्कृतीमध्ये काही महिन्यांना विशेष महत्व आहे. त्यामध्ये अधिक मासाचे तर वेगळे महत्व असते. या महिन्यात जावई लोकांची चांदी असते. सध्या अधिक मास (धोंड्याचा महिना) सुरू असल्यामुळे सर्वत्र जावयाचा मानपान व सन्मान करण्यात सासू सासरे खूपच व्यस्त आहेत.हिंदु संस्कृतीमध्ये या अधिक मासाला खूप महत्व आहे. मुलगी व जावई यांना लक्ष्मी-नारायणाचे रूप मानले जाते. त्यामुळे सासरवाडीला या जोडीला कपड्याचा संपुर्ण पोषाख (आहेर), ताट, चांदी किंवा तांब्याचा दिवा, तेहेतीस अनारसे व बत्ताशे भेट देवून सन्मान केला जातो. दर तीन वर्षातून एकदाच अधिक मास येत असतो. अकलूज येथील मोतीलाल वेळापूरे यांच्या भांड्याच्या दुकानात वाण खरेदी करण्यासाठी महिला वर्गांची लगबग सुरू आहे.

## तुकाराम मुंढेच्या नियुक्तीने अन्न व औषध प्रशासन अलर्ट

**पिलीव परिसरातील खाजगी दुध संघ व इतरांचे धाबे दणाणले**



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३१ मे -**

तुकाराम मुंढे यांची नुकतीच अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी नियुक्ती झाली. या नियुक्तीनंतर महाराष्ट्रातील अख्खा अन्न व औषध प्रशासन विभाग कामाला लागला आहे. कधीच कारवाई न करणारे अधिकारी चांगलेच कामाला लागले आहेत. जिल्हाधिकारी असताना मुंडे यांनी केलेल्या कामाचा अनुभव असल्याने पिलीव परिसरातील भेसळ करणारे खाजगी दुध संघ व इतरांचे धाबे दणाणले आहे.

जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन विभाग चांगलाच अलर्ट मोडवर गेला आहे. नुकतीच अकलूज येथे पामतेलाच्या साठ्यावर तसेच दुध संकलन केंद्रावर कारवाई केल्याने माळशिरस तालुक्यात खळबळ उडाली आहे. माळशिरस तालुक्यात खाजगी दुध संघाचे प्रचंड मोठे जाळे आहे. यामध्ये अनेक खाजगी संघ गोलमाल करीत असल्याचे बोलले जाते. यामुळे सध्या माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात खाजगी दुध संघ वाल्यांचे कारवाईच्या भितीने अक्षरश: धाबे दणाणले आहेत.

तालुक्यात तसेच पिलीव परिसरातील अनेक खाजगी दुध संघ व मोठे दुध उत्पादकही भेसळ करीत असल्याचे खाजगीत बोलले जात आहे. मात्र या अगोदर संबंधित खात्याचे अधिकारी व त्यांचे चांगले हितसंबंध असल्यामुळे तक्रारी करूनही कारवाई होत नव्हती. पण सध्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या रडारवर खाजगी दुध संघ, गुटखा व मावा विक्री करणारे, मोठे किराणा माल व भुसार मालाचे व्यापारी असल्याचे बोलले जात आहे.

भेसळीमुळे खरेतर वेगवेगळ्या प्रकारचे कॅन्सर व इतर आजार जडतात. गुटखा व माव्यामुळे तोंडाचा कॅन्सर होतो. ज्यामुळे दरवर्षी हजारो बळी जातात. अकलूज येथे कारवाई केल्यामुळे सध्या तालुक्यात याची जोरदार चर्चा सुरु असुन भेसळ करणाऱ्याचे अक्षरश: धाबे दणाणले आहेत.

### खासगी दुध संघाला नोटीस आल्याची चर्चा

सर्वसामान्य नागरिकांमधून तुकाराम मुंडेंसारख्या खमक्या अनेक अधिकाऱ्यांची महाराष्ट्राला गरज असल्याचे बोलले जात आहे. अशातच पिलीव परिसरातील एका खाजगी दुध संघाला सदर विभागाची नोटीस आल्याची ही चर्चा आहे.

### तरुणाची नशेत आत्महत्या

**सोलापूर , दि. ३१ मे-**

२८ वर्षीय तरुणाने दारूच्या नशेत घरातील अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली. देगाव भागात योगेश्वर नगरात आज सकाळी सहा वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. प्रवीण धोंडिबा कोळी (वय २८) असे मृत तरुणाचे नाव आहे. प्रवीण रविवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास आईशी भांडण करून तिच्याकडून पैसे घेऊन बाहेर गेला होता. त्यानंतर त्याने घरी येऊन नशेमध्ये स्वत:ला गळफास लावून घेतला. सहाय्यक फौजदार के.पी. नीळ यांनी मृतदेह शव विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला.

## खर्डी येथील जुगार अड्ड्यावर छापा; १३ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ मे-**

पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथील खताळ वस्ती येथील जुगार अड्ड्यावर पंढरपूर पोलिसांनी छापा टाकला. कारवाईत १३ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त करत आठ जणावर कारवाई केली. खताळ वस्ती येथील जुगार अड्ड्यावर काही इसम रमी नावाचा पत्त्याचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तपासणीत एका आंब्याच्या झाडाखाली मोकळया जागेत रात्री पावणे अकरा वाजता दिव्याच्या उजेडात काही इसम जुगार खेळत असल्याचे निर्देशनास आले. सदर ठिकाणी तात्काळ कारवाई करुन १३ लाख ६५ हजार १७० रुपयाचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.

सदर जागा संतोष सुखदेव खताळ याच्या मालकीची आहे. त्याने ही जागा जुगार खेळण्याकरीता वापरण्यास दिल्याचे समजले. कारवाईत ११ हजार १७० रुपये रोख, सात मोबाईल, पत्याची पाने, दोन चारचाकी वाहन, तीन दुचाकी मोटार सायकल असा एकुण १३ लाख ६५ हजार १७० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये खर्डी येथील संतोष सुखदेव खताळ (वय ३२), फिरोज इलाही आतार (वय ३८), मारूती नारायण अभिमंत (वय ३६), समाधान भारत वाकडे (वय ३५), सिताराम मारूती चव्हाण (वय ३८) अस्लम दाउद शेख (वय ३२,रा.शेळवे), कुलजित मारूती देशमुख (वय ४०, रा.कासेगाव), दिगंबर लक्ष्मण पवार (वय ५५, रा.उंबरगाव) अशा आठ जणांवर कारवाई करण्यात आली.

सदर कामगिरी पोहेकॉ सर्जे, पोकॉ हुलजंती, माने, भंडरवाड, सावंत, कुचेकर, साठे, लोखंडे, सुर्यवंशी, लोंढे यांनी केली असल्याची माहिती सहा.पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.

## 'स्वेरी'च्या १७ विद्यार्थ्यांचे 'गेट' परीक्षेत यश

**विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाची साथ**




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ मे -**

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत घेतलेल्या 'गेट' परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत स्वेरी म हाविद्यालयातील तब्बल १७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे घवघवीत यश मिळवले आहे. परीक्षेत संस्थेतील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करत देशपातळीवर सर्वोच्च ६४९ रँक मिळवली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये ओम पाटील, सोहम कुलकर्णी, अनुष्का घोडके, आदेश कोंढारे, वैष्णवी मस्के, विवेक पवार, ओंकार देशमुख, समर्थ मोटे, आकाश चव्हाण, जय जाधवर, तुषार कर्डुले, भाग्यवान सायकर, संकेत मोरे, श्रेयस लोकरे, रणजीत धनवडे, आदेश देठे व रोहन ताटीपामल या १७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यातील कांही विद्यार्थ्यांनी दोन स्वतंत्र पेपर देऊन अधिक यश मिळवले आहे.

यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### नाईट स्टडी, गेस्ट लेक्चर्समुळे यश

स्वेरीतील सातत्यपूर्ण सराव सत्रे आणि उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या मार्गदर्शन, प्रथम वर्षापासून घेतलेल्या नाईट स्टडी व गेस्ट लेक्चर्स यांचा गेट परीक्षेत यशस्वी होण्यासाठी खूप फायदा झाल्याचे यशस्वी विद्यार्थ्यांनी सांगितले.

# विठ्ठल मंदिरातील दर्शन बारीसाठी पॉलीकार्बोनेटचा वापर

**दर्शनरांगेतूनच घडते आहे मंदिरावरील कळसाचे दर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ मे -**

विठ्ठल मंदिरातील अंतर्गत दर्शन बारीचे काम पूर्ण झाले आहे. भाविकांना ऊन, वारा, पाऊस यापासून त्रास होऊ नये यासाठी प्रथमच दर्शन बारीच्या छतासाठी पॉलीकार्बोनेट शीटचा वापर केला आहे. या अत्याधुनिक पारदर्शक छतामुळे भाविकांना मंदिरावरील कळसाचे दर्शनही घेता येणार आहे. नव्याने उभारलेल्या दर्शन बारीमुळे भाविकांचे दर्शन अधिक सुलभ झाले आहे.



विठ्ठल मंदिर जतन आणि संवर्धनाचे काम सुरु आहे. जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे डिसेंबरअखेर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आषाढी वारीच्या पार्श्वभुमीवर कामाला वेग आला आहे.

भारतीय पुरातत्त्व विभागाच्या सूचनेनुसार मंदिरातील हत्ती दरवाजा ते रुक्मिणी मंदिरपर्यंत नव्याने दर्शन रांग तयार केली आहे. नव्या दर्शन रांगेमुळे भाविकांचा त्रास कमी झाला आहे, तसेच उन,पावसा पासून संरक्षणही झाले आहे.

येथील दर्शन बारीसाठी प्रथमच पॉलीकार्बोनेट शीटचा वापर केला आहे. ३५ फूट लांब आणि ३ फूट रुंद अशी दर्शन रांग तयार केली आहे. अत्याधुनिक आणि आकर्षक पध्दतीने तयार केलेले दर्शन रांगेवरील छत हे पूर्णपणे पारदर्शक आहे.

रांगेतून भाविकांना मंदिरावरील कळस दर्शन व्हावे अशी यामध्ये सुविधा उपलब्ध केली आहे. भाविकांमधून या नव्या सुविधेमुळे समाधान व्यक्त होत आहे.

### भाविकांचे उन-वाऱ्यापासून होणार संरक्षण

दर्शन रांगेत पॉलीकार्बोनेट शीटच्या वापरामुळे भाविकांना दर्शनरांगेतून कळसाचे दर्शन घेता येत आहे. दर्शन रांग सुलभ व जलद होण्यास मदत झाली आहे. उन,वारा पाऊस यापासून भाविकांचे संरक्षणही होणार आहे.

**- प्रवीणकुमार घम, व्यवस्थापक, श्रीविठ्ठल मंदिर, पंढरपूर.**